**मंगलम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**
**पत्ता:-स.नं. १२९/1 ब व स.न. १५९/1 अ. प्लॉट नं. १५, १६ मोहननगर, चिंचवड**
**नोंदणी क्र.:- पी.एन.ए.(एच.एल.आय) एच.एस.जी.(टी.सी.)/२५२१/९२/९३**

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

मंगलम सहकारी गृहरचना संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासा संदर्भात, विकासकांचे सादरीकरण बाबत दिनांक **०४.०७.२०२५** रोजी **सकाळी** ठिक **११.०० ते दुपारी ०४.००** या वेळेस **बर्ड वॅली बॅंकेट, टेल्को रोड,एमआयडीसी चिंचवड,पुणे येथे** आयोजित करण्यात आली होते. संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प संस्थेचे सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि त्यानंतर विकासकांना सादरीकरण करण्यासाठी अनुमती देण्यात आली.

**विषय क्रमांक ०१:-** एकूण ०४ विकसकांनी टेंडर प्रेझेंन्टेशन बाबतीत सादरीकरण करणे.

**ठराव क्रमांक ०१:-** संस्थेसाठी निवड केलेल्या एकुण ०४ विकसकांपैकी दिनांक **०४.०७.२०२५** रोजी **०४ विकसकांना** निविदा सादरीकरणासाठी आमंत्रित केले होते. प्रत्येक विकसकाला एकुण ४५ मिनिटांचा स्लॉट देण्यात आला होता त्याप्रमाणे प्रत्येक विकसकाने आपाआपले टेंडर शिस्तबध्दरित्या सादरीकरण केले.

सर्वात प्रथम मेसर्स. **युनिस्क्वेअर डेव्हलपर्स** यांनी आपले प्रेझेंन्टेशन सादर केले संपुर्ण कंपनी संदर्भात माहिती देऊन आपल्या संस्थेसंदर्भातील टेंडर प्रेझेंन्टेशन मध्ये जी ऑफर दिली होती त्यासंदर्भात सादरीकरण केले सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील समाधानकारक देण्यात आले.

त्यानंतर मेसर्स. **प्रगती ग्रुप** या कंपनीने यांनी त्यांच्या कंपनीची सुरुवात कशा स्वरुपात चालु करून त्याचा वटवृक्ष कशा पध्दतीने उभा केला आहे याबद्यलची माहिती, जी संस्थेकडे ऑफर भरुन देण्यात आली त्याबद्यल सविस्तर माहिती आणि त्यांनी कोणत्या भागामध्ये किती स्क्वे.फुटाचे काम केले आहे यासदंर्भातील माहिती सभासदांना दिली. त्यानंतर सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर मेसर्स. **बी.ऑरबिट रिअॅलेटर्स** यांनी उपस्थित असलेल्या सभासदांचे स्वागत करुन त्यांनी त्यांच्या पुनर्विकास साईट व्हिजिट या नाशिक मध्ये केल्या आहे पण त्यांचा त्यातला अनुभव या क्षेत्रामध्ये मोठा आहे याबाबत सभासदांनी प्रश्न विचारले असता सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर मेसर्स. **श्री साई डेव्हलपर्स** त्यांची टिम हे उपस्थित होती त्यांनी त्यांच्या प्रेझेंन्टेशमध्ये सुरुवात ते आपल्या बिल्डींगमध्ये त्यांनी काय वेगळेपण दिले आहे त्याचा सविस्तर वृत्तांत मांडला त्यानंतर सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

सुचक:- श्री. कुदळे डी.बी. अनुमोदक:- श्री. ज्युडी जोसेफ

विषय क्रमांक ०२:- वरील विकसकांबरोबर पुढील कार्यवाहीचे स्वरुप ठरविणे.

**मंगलम सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**

**पत्ता:-स.नं. १२९/1 ब व स.न. १५९/1 अ. प्लॉट नं. १५, १६ मोहननगर, चिंचवड**

**नोंदणी क्र.:- पी.एन.ए.(एच.एल.आय) एच.एस.जी.(टी.सी.)/२५२१/९२/९३**

---

**<u>ठराव क्रमांक ०२:-</u>** एकूण ०५ विकसकांनी टेंडर प्रेझेंन्टेशन सादर केल्यानंतर संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प संस्थेचे सल्लागार श्री. संजय सुर्यवंशी यांनी सर्व विकसकांचे संस्थेच्या सभासदांच्या वतीने आभार मानले. सर्व विकसकांच्या बिल्डर साईट व्हिझिट करण्यासाठी प्रत्येकी २ साईट सभासदांना बघायच्या आहेत त्याप्रमाणे प्रत्येक बिल्डरला आधी एक आठवडाभर तसे कळवण्यात येईल असे सर्व सभासदांसमोर सांगितले. वरील ठरावाअंती श्री. संजय सुर्यवंशी आणि त्यांची पुर्ण टिम यांचे पुनर्विकास समितीतर्फे आभार मानले.

सुचक :-श्री. प्रवीण बनकर

अनुमोदक :-श्री. संकेत जाधव

**<u>ठराव सर्वसंमत</u>**

मंगलम सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने

अध्यक्ष सचिव खजिनदार

मंगलम् सह.

खजिनदार

Reg. No. PNA(HL)HSG(TC) /2521/92-93